ePaper
‘स्मार्ट सिटी’ पिंपरी-चिंचवड महापालिकेचा आज वर्धापन दिन



वर्ष - 7 । अंक - 154 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- इंग्लंडने बांगलादेशला चिरडले!
- झरीनला कोर्टाचा मोठा दिलासा!
- पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर ‘ब्लॉक’
- सुप्रिया सुळेंची अजित पवारला साद?

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 11 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ताथवडेत स्फोट...कासारवाडीत लिकेज

# पिंपरी-चिंचवड ‘गॅस’वर ?



। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी।

**सुमारे ३० लाख लोकसंख्या असलेले पिंपरी-चिंचवड शहर सुरक्षेच्या दृष्टीने गॅसवर आहे का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. गेल्या दोन दिवसात गॅस चोरी आणि लिकेजच्या घटनांमुळे शहर हादरले असून, सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झालेली नाही. पण, ताथवडेतील गॅस चोरी करताना झालेला भीषण स्फोट आणि कासारवाडी येथील जलतरण तलावात क्लोरीन गॅस लिकेज झाल्यामुळे २२ नागरिकांना रुग्णालयात दाखल करावे लागले. या घटनांमुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांना शहराच्या सुरक्षेबाबत गांभीर्याने विचार करणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा सुरक्षेबाबत अराजकता माजली, तर जबाबदारीही घ्यावी लागेल.**





पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या हद्दीतील सर्व जलतरण तलावांचे ‘सुरक्षा ऑॅडिट’ करण्यात येणार आहे. त्याची तात्काळ कार्यवाही सुरू करण्यात येईल, अशी माहिती महापालिका क्रीडा विभागाचे अधिकारी मिनीनाथ दंडवते यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कासारवाडी जलतरण तलावात क्लोरीन गॅस लिकेज झाल्याची घटना घडली. त्यामुळे श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने पोहोण्यासाठी आलेले नागरिक, जीवरक्षक, सुरक्षा रक्षक अशा २२ जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. यासंदर्भात माहिती मिळताच भाजपा आमदार महेश लांडगे, शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी तात्काळ रुग्णालयात धाव घेतली. उपचारार्थी नागरिकांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

दरम्यान, या दुर्घटनेत खासगी रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या उपचाराचा खर्च पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने करावा. महापालिका प्रशासनाच्या वतीने शहरातील सर्व जलतरण तलावांचे सुरक्षा ऑडिट करावे. भविष्यात अशी घटना समोर येवू नये. यासाठी प्रशासनाने संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावावी. तसेच, दोषींवर कारवाई करावी, अशी सूचना लोकप्रतिनिधींनी केल्या आहेत.शहरातील नागरिकांच्या दृष्टीने प्रशासनाने आता गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे.

## सुरक्षेबाबत तडजोड नको : आमदार महेश लांडगे



कासारवाडी जलतरण तलावावर गॅस लिकेजची घटना घडली. यामुळे नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होवू लागला. रुग्णालयात दाखल करावे लागले. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. महापालिका प्रशासनाने गांभीर्याने या घटनेची चौकशी करावी. तसेच, सर्वच जलतरण तलावावरील संबंधित ठेकेदार, एजन्सी यांना सुरक्षा ऑॅडिट बंधनकारक करावे. नागरिकांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करू नये, अशी सूचना प्रशासनाला केली आहे, अशी प्रतिक्रिया भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली.

## पुन्हा अशी घटना घडू नये : शहराध्यक्ष शंकर जगताप



अशा घटना दुर्दैवी आहेत. पालिका प्रशासनाकडून संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांची चौकशी करावी. आगामी काळात पालिकेच्या वतीने सर्वच जलतरण तलावांचे ‘ऑडीट’ करणे आवश्यक आहे. अशा घटना प्रशासनाला अंतर्मुख करायला लावणाऱ्या आहेत त्यामुळे या गोष्टींकडे प्रशासनाने काळजीपूर्वक पाहणे आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी दिली. कासारवाडी येथील जलतरण तलावावर झालेली क्लोरीन गॅस गळतीची घटना अत्यंत दुर्दैवी असून, यामुळे मोठी जिवीतहानी झाली असती. त्यामुळे प्रशासनाने अशा गोष्टींकडे गंभीरपणे पहाणे गरजेचे आहे, असेही जगताप यांनी म्हटले आहे.

# अजित पवारांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकपदाचा दिला राजीनामा!

## » रिक्त झालेल्या जागेवर कुणाची वर्णी लागणार?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाचा राजीनामा दिला आहे. अजित पवारांनी राजीनामा दिल्यानं राज्यातील राजकारणात चर्चेला उधाण आलं होतं. यावर पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.**

राज्यात पक्ष संघटनेसाठी द्यावा लागणारा वेळ, उपमुख्यमंत्री पदाच्या कार्यबाहुल्यामुळे बँकेच्या कामकाजात लक्ष देता येत नाही तसेच बैठकांना उपस्थित राहता येत नसल्याचे कारण दिल्याने बँकेच्या संचालक मंडळाने त्यांचा राजीनामा मंजूर केला आहे. अजितदादा राजकारणात सक्रिय झाल्यानंतर १९९१ साली पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक झाले.

तेव्हापासून ते आतापर्यंत सुमारे ३२ वर्षे त्यांनी संचालक म्हणून काम पाहिले. चारवेळा उपमुख्यमंत्रीपद भूषविलेल्या अजित पवार यांना एकनाथ शिंदे आणि भाजपचे देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये पाचव्यांदा उपमुख्यमंत्री पद भूषविण्याची संधी मिळाली.



ही संधी मिळाल्याने अजित पवार यांचा गट बाहेर पडून सत्तेत सहभागी झाला. मात्र, तेव्हापासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवार आणि अजित पवार हे दोन गट पडले आहेत. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाची जानेवारी २०२१ मध्ये निवडणूक झाली. त्यावेळी संचालक मंडळाच्या प्रचारार्थ पुण्यात झालेल्या सभेवेळी अजितदादांनी, 'आपण निवडणूक लढविण्यास इच्छुक नाही. दिलीप वळसे पाटील, दत्तामामा भरणे यांच्यासह संचालक मंडळाच्या आग्रहाखातर आपण पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहोत,' असे जाहीरपणे सांगितले होते. बँकेच्या तीन बैठकांना उपस्थित राहणे हे संचालकांवर बंधनकारक आहे.

### बँकेने विविध योजना राबविल्या

» अजितदादांनी बँकेचा राजीनामा दिला आहे,' असे संचालकांनी सांगितले. १९९१ साली बँकेचा व्यवसाय हा ५५८ कोटी रुपयांचा होता. तो आता २० हजार ७१४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. अजितदादांच्या नेतृत्वाखाली बँकेने विविध योजना राबविल्या. एटीएम, गुगल पे सुविधा, शेड्युल बँकेचा दर्जा तसेच देशातील आघाडीची बँक म्हणून नावलौकिक मिळविला आहे. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाची जानेवारी २०२१ मध्ये निवडणूक झाली. त्यावेळी संचालक मंडळाच्या प्रचारार्थ पुण्यात झालेल्या सभेवेळी अजितदादांनी, 'आपण निवडणूक लढविण्यास इच्छुक नाही.

'राज्याच्या सत्तेत सहभागी झाल्याने राष्ट्रवादीचे पक्ष संघटनासाठी वेळ द्यावा लागत आहे. तसेच उपमुख्यमंत्री पदाचा कार्यभाराचा व्याप अजितदादांवर वाढला आहे.

त्यामुळे बँकेच्या प्रत्येक बैठकींना अजितदादांना उपस्थित राहणे शक्य होत नाही. बँकेच्या गेल्या बैठकीला ते अनुपस्थित होते. तसेच दादांच्या वेळेनुसार, बँकेच्या बैठकांची वेळ ठरविणे प्रत्येक वेळी शक्य नाही. काही निर्णय त्या त्या वेळी घेणे गरजेचे असल्याने दादांच्या वेळेनुसार बैठक घेणे योग्य ठरणार नाही.

# सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचा सव्वा चारशे कोटीचा आराखडा केंद्राकडे!

## » एका महिन्यात सुरु होणार निविदा प्रक्रिया

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील महापालिकेचे कालबाह्य झालेले सहा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अद्ययावत करण्यासाठीच्या सर्वंकष प्रकल्प आराखड्यास (डीपीआर) महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरणाने (एमजीपी) मान्यता दिली आहे. त्यामुळे आता केंद्र शासनाकडून या प्रकल्पास अंतिम मान्यता मिळण्यासह या कामासाठी ४२५ कोटी रुपयांचा निधी मिळण्याचाही मार्ग मोकळा झाला आहे.**

दरम्यान हा आराखडा मंजुरीचे काम संथ गतीने सुरु असल्याचे वृत्त ऑगस्ट महिन्यात दिले होते. शहरात वाहणाऱ्या मुळा नदीमध्ये प्रक्रिया न केलेले घरगुती व उद्योगांचे सांडपाणी येत असल्याने प्रदूषण वाढले आहे. नदीतील बीओडीचे प्रमाण कमी करून, सोओडी आणि विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. महापालिकेने २००८ पूर्वी शहरात १० मैला शुद्धीकरण केंद्र उभारले. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सुधारित निकषानुसार पाण्यातील बीओडीचे प्रमाण हे ३० मिलीग्रॅमऐवजी १० मिलीग्रॅम पर्यंत कमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेच्या ९ पैकी ६ प्रकल्पांमध्ये 'एसबीआर' हे तंत्रज्ञानाचा नसल्याने निकषांची पूर्तता होत नव्हती. त्यामुळे विठ्ठलवाडी, एरंडवणा, बोपोडी, भैरोबानाला, तानाजीवाडी, नायडू या सहा प्रकल्पांमधील तंत्रज्ञान अद्ययावत करण्याचा निर्णय घेतला.



> 'शहरातील ९ पैकी ६ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील तंत्रज्ञान अद्ययावत करण्याचा आराखडा एमजीपीने मान्य केला आहे. या आराखड्यास केंद्र सरकारकडून त्वरित मान्यता मिळेल. पुढील महिन्याभरात ही मान्यता मिळाल्यानंतर लगेच निविदा प्रक्रिया राबविली जाईल. या प्रकल्पामुळे मुळामुठा नदीतील शुद्ध पाण्याचे प्रमाण वाढणार आहे,
>
> **- श्रीनिवास कंदूल,** मुख्य अभियंता, विद्युत विभाग

# ललित पाटीलवर नऊ महिने कोणता उपचार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अंमली पदार्थ तस्कर ललित पाटील पुण्यातील ससून रुग्णालयातून पळून जाण्याच्या घटनेला आठ दिवसांचा कालावधी उलटला आहे. मात्र अद्यापही ललित पाटील याचा शोध घेण्यात पुणे पोलिसांना यश आले नाही. रुग्णालयातून रुग्ण पळून गेल्याने पोलिसांवर कारवाई करण्यात आली आहे. परंतु, संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांवर अद्यापही कारवाई करण्यात आलेली नाही. तसंच, ललित पाटील हा गेल्या नऊ महिन्यांपासून ससून रुग्णालयात दाखल होता. त्यामुळे त्याला नेमका कोणता आजार झाला होता याविषयी डॉक्टरांनी माहिती दिली आहे. ललित पाटील गेल्या नऊ महिन्यांपासून रुग्णालयात उपचार घेत होता. त्यामुळे त्याला नेमका कोणता आजार झाला होता? असा प्रश्न ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता संजय ठाकूर यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले की, "ललित पाटीलच्या आरोग्याप्रश्री हायकोर्टाकडूनही पत्र आलं होतं. त्यानुसार, तज्ज्ञ डॉक्टरांनी त्याची तपासणी करून हायकोर्टाला उत्तर सादर केलं आहे. ललित पाटीलला चार ते पाच प्रकारचे आजार झाले होते. त्याच्यावर चार डॉक्टर उपचार करत होते." "त्याला कोणता आजार होता याविषयी मी सांगू शकत नाही. पण त्याला चार ते पाच प्रकारचे आजार होते. एकट्या रुग्णाला तीन ते चार डॉक्टर तपासत असतात. त्यानुसार, ललित पाटीलवरही चार ते पाच डॉक्टर उपचार करत होते. त्याच्या योग्य तपासण्या सुरू होत्या. तपासण्या करून ज्या आजारांचं निदान झालं, त्यानुसार त्याच्यावर उपचार सुरू होते.

## भाजपाच्या महाविजयाची तयारी अन् शहराध्यक्ष

# शंकर जगताप यांचे 'प्रभावी व्यवस्थापन'!

## घर चलो अभियान : मावळ लोकसभा मतदार संघात जोरदार मोर्चेबांधणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीने 'महाविजय- २०२४' मोहीम हाती घेतली आहे. या मोहीमेद्वारे महाराष्ट्रातील एकूण ४८ पैकी ४५ जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे. भाजपासाठी प्रत्येक जागा महत्त्वाची मानली जात असून, पिंपरी-चिंचवडमधील निर्णायक मतदान मावळ आणि शिरुर लोकसभेसाठी 'किंगमेकर' ठरणार आहे. त्यामुळे, पक्षनेतृत्त्वाकडून भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्त्वात चिंचवड आणि पिंपरी मतदार संघात जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे.**



महाविजय- २०२४ अंतर्गत घर चलो अभियान, भाजपा वॉरिअर्स संवाद या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे बुधवार, दि. ११ ऑक्टोबर २०२३ रोजी पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर येत आहेत. मावळ लोकसभा प्रवास दौरा कार्यक्रमाच्या तयारीची जबाबदारी शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्याकडे आहे. पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून नुकतेच जाहीर केलेली कार्यकारिणी यानिमित्ताने कामाला लागली आहे.

निवडणूक व्यवस्थापनात प्रभावी हातखंडा असलेले शंकर जगताप यांच्या खांद्यावर मावळ लोकसभेतील पिंपरी आणि चिंचवड या दोन प्रमुख विधानसभा मतदार संघांची जबाबदारी आहे. या दोन मतदार संघातच सुमारे ९ लाखाहून अधिक मतदार आहेत. पिंपरी, चिंचवड आणि मावळ असे घाटाच्या वरचे आणि कर्जत, पनवेल आणि उरण असे घाटाच्या खालचे असे सहा विधानसभा मतदार संघ असलेल्या या मावळ लोकसभा मतदार संघात पिंपरी आणि चिंचवडमधील मतदार निर्णायक ठरणार आहेत.

दरम्यान, महायुतीच्या माध्यमातून उमेदवार कोणीही असून, आम्ही लढण्याचा निर्धार केला आहे आणि जिंकण्याचा आत्मविश्वास आहे, असा दावा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला. त्यामुळे 'निवडणूक व्यवस्थापन' प्रभावीपणे करुन मावळ पुन्हा काबिज करण्यासाठी भाजपाची यंत्रणा कामाला लागलेली पहायला मिळत आहे.

### बावनकुळे यांच्या दौऱ्याची जय्यत तयारी...

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे पिंपरी-चिंचवडचा दौरा करणार आहेत. या निमित्त शहर भाजपाच्या वतीने जोरदार तयारी करण्यात आली आहे. बावनकुळे यांच्या स्वागताचे ठिकठिकाणी बॅनर लावले आहेत. तसेच, पिंपरीतील राधिका चौक- शगुन चौक- साई चौक या भागात रॅली काढण्यात येणार आहे. यासाठी पिंपरी आणि चिंचवड विधानसभा मतदार संघातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते कामाला लागले आहेत. या अभियानाच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय, विकासकामे आणि विविध योजनांची माहिती सर्वसमान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे. "घर चलो अभियान" प्रभावीपणे राबवून भाजपा किंबहुना मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रमांची आखणी करण्यात येत आहे. याचा फायदा भाजपाला आगामी महापालिका आणि विधानसभा निवडणुकीत होईल, असा दावा केला जात आहे.

### ठरणार मावळ लोकसभेचे 'किंगमेकर'...

शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांना २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत सर्वाधिक मते पिंपरी आणि चिंचवडमधून मिळाली आहेत. त्यावेळी भाजपाचे तत्कालीन शहराध्यक्ष स्व. आमदार लक्ष्मण जगताप होते. बारणे आणि जगताप यांच्या राजकीय संघर्षाची परिस्थिती असतानाही लक्ष्मण जगताप यांनी 'महायुती धर्म' पाळला. त्याचा फायदा खासदार बारणे यांना निश्चितपणे झाला. लक्ष्मण जगताप शहराध्यक्ष असताना झालेल्या या निवडणुकीत "निवडणूक व्यवस्थापनाची जबाबदारी" शंकर जगताप यांच्याकडे होती. दिवंगत जगताप यांच्यानंतर चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक झाली. त्यावेळी कसब्यातील जागा भाजपाला गमवावी लागली. मात्र, शंकर जगताप यांच्या अचूक व्यवस्थापनामुळे चिंचवडची जागा भाजपाला राखता आली, ही वस्तुस्थिती आहे. शंकर जगताप लोकसभा निवडणूक लढवतील, असे अंदाज राजकीय वर्तुळात वर्तवले जात होते. मात्र, "मी लोकसभेसाठी इच्छुक नाही..." असे स्पष्ट करीत जगताप यांनी सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत शहराध्यक्ष या नात्याने शंकर जगताप पूर्ण ताकदीने मैदानात उतरणार आणि दिवंगत जगताप यांच्याप्रमाणे पुन्हा एकदा नेतृत्त्व क्षमता सिद्ध करणार, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.


---

# 'तुझा आवाका किती... तू बोलतो किती...'

## अजित पवार गटाचे शेखर काटे यांची टीका : मेहबूब शेख यांना दिले प्रत्त्यूत्तर

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवडसह महाराष्ट्रात केलेल्या विकासाचा झंझावात सर्वज्ञात आहे. मात्र, आपणच सर्वज्ञानी असलेल्याच्या अविर्भावात मेहबूब शेख अजितदादांच्या क्षमतेबाबत प्रश्न विचारत आहेत. विकासाच्या मुद्यावर भाजपासोबत महायुतीमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेवून आता १०० दिवस झाले. मात्र, अजितदादांवर टीका केल्याशिवाय काहींचा दिवस जात नाही, अशी टिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे युवकाध्यक्ष शेखर काटे यांनी केली आहे.**



राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी नुकताच पिंपरी-चिंचवड दौरा केला. या दौऱ्यात मेहबूब शेख यांनी "अजित पवार खरंच कामात वाघ असतील, तर गुजरातला गेलेले प्रकल्प परत आणावेत, अशी टीका केली होती. त्याला अजित पवार गटाकडून जोरदार प्रत्यूत्तर देण्यात आले आहे.

शेखर काटे म्हणाले की, दादांसारखा वाघ होता... म्हणून तुमच्यासारख्या अनेकांना संधी मिळाली. कालपरवापर्यंत दादांच्या मागेपुढे करणाऱ्यांनी आपली राजकीय उंची तपासावी. "अजितदादांनी... राज्याबाहेर गेलेले प्रकल्प परत आणावेत" असा ज्ञानाविष्कार दाखवण्यापेक्षा आपले अस्थित्व टिकवण्यासाठी काय करावे? याचा अभ्यास करावा. अन्यथा आगामी काळात आम्ही जशात तसे उत्तर देवू.

पिंपरी-चिंचवड शहराचा विकास अजित पवार यांनीच केला, असे स्तूती कालपर्यंत करणारे कथित नेते दादांवर पात्रता नसताना बोलत आहेत. त्यामुळे त्यांना दादांच्या भाषेत सांगायचे झाले तर, "तुझा आवाका किती... बोलतो किती..." अशी परिस्थिती आहे. आमचे नेते छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल यांच्यावर बोलण्याची आपली उंची आहे का? याचा विचार करावा, असेही शेखर काटे म्हटले आहे.

### ... अन्यथा जागा दाखवणार!

सन्माननीय शरद पवार हे देशाचे नेते आहेत. त्यांच्याबाबत आमच्या मनात कायम आदराचे स्थान आहे. मात्र, कोणपण उठतो आणि दादांबद्दल बोलतो हे आता खपवून घेतले जाणार नाही. शहरातील स्थानिक आणि बाहेरून स्थायिक झालेल्या नागरिकांना अजित पवार यांच्या कामाचा झपाटा आणि धडाडी माहिती आहे. त्यामुळेच दादांच्या नेतृत्वात या शहरात सुमारे २० वर्षे लोकांनी दादांना साथ दिली. या शहरात मातब्बर नेते तयार झाले. याचे भान त्यांनी ठेवावे आणि मग अजितदादांबाबत बेताल वक्तव्य करावे. अन्यथा आपल्याला पद्धतशीर जागा दाखवली जाईल, असा इशाराही शेखर काटे यांनी दिलला आहे.

# शिवकालीन इतिहासाची अनुभूती




**कुठल्या प्रसंगी कोणते शस्त्र वापरावे याबाबत छत्रपती किती दक्ष होते, हे अफझलखान वधामुळे सिद्ध होते. त्या वेळी त्यांनी वापरलेली वाघनखे पुन्हा महाराष्ट्रभूमीत येत असल्याच्या निमित्ताने आजच्या पिढीसमोर त्या इतिहासाची उजळणी होईल, हीच आमच्या प्रयत्नांची फलश्रुती ठरेल..**

इतिहासातील एखाद्या कालखंडावर आपले कितीही प्रेम असले, इतिहासातील एखाद्या महापुरुषाविषयी आपल्याला कितीही अभिमान असला तरी आपल्याला घड्याळाचे काटे उलटे फिरवून त्या इतिहासात जाता येत नाही. इतिहासातील महान घटनांचे साक्षीदार होता येत नाही. परंतु साहित्य, कला यांतून आपण त्या काळाची अनुभूती घेऊ शकतो. त्या काळाला, त्या इतिहासाला स्पर्श करण्याचे आणखी एक साधन असते, ते म्हणजे त्या काळातील उल्लेखनीय व्यक्तींच्या स्पर्शाने पावन झालेल्या वास्तू. महाराष्ट्राचे दैवत आणि मराठी माणसाचा अभिमान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा स्पर्श लाभलेली वाघनखे भारतात आणण्यासंदर्भात झालेला करार हा माझ्यासाठी त्यामुळेच आयुष्यातील एक सुवर्णक्षण आहे. माझ्या स्मृतींच्या कोंदणात तो कायमचा राहणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित



पवार यांच्यामुळे मला लंडनमध्ये या कराराच्या वेळी उपस्थित राहण्याची संधी मिळाली, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. या कराराच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित राहिले होते. व्हिक्टोरिया अँण्ड अल्बर्ट संग्रहालयाचे संचालक ट्रायस्टम हण्ट, भारताचे लंडनमधील उच्चायुक्त, त्यांचे सहकारीही यावेळी उपस्थित होते. 'शिवरायांचा आठवावा प्रताप' असे आपण म्हणतो तेव्हा त्यांच्या त्या प्रतापाची जी ऐतिहासिक साधने उपलब्ध आहेत, ती आपल्याला प्रेरणा देत असतात. वाघनखे हे त्यांपैकीच एक छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेली वाघनखे भारतात आणण्याचा हा संकल्प राज्य सरकारने शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षाचे औचित्य साधून केला होता. राज्याचे वने आणि सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि मी लंडन येथे जाऊन ३ ऑक्टोबरला या संबंधात इग्लंडशी सामंजस्य करार केला. १७१ वर्षे जुन्या असलेल्या व्हिक्टोरिया अँण्ड अल्बर्ट म्युझियमशी हा करार आम्हाला करता आला याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो. या करारानुसार ही वाघनखे नोव्हेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२६ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता भारतात राहतील. ती महाराष्ट्रातील विविध संग्रहालयांत शिवप्रेमी, इतिहासप्रेमी नागरिकांना पाहण्यासाठी ठेवण्यात येतील. यात सातारा, नागपूर, कोल्हापूर येथील राज्य पुरातत्त्व विभागाच्या संग्रहालयांसह मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचा (पूर्वीचे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम) समावेश असणार आहे. या वाघनखांच्या अस्सलतेसंबंधी शंका उपस्थित करण्याचे प्रयत्न केले गेले. शिवाजी महाराजांचे नाव घेऊनच आयुष्यभर ज्यांनी राजकारण केले, त्यांनी शिवस्पर्श झालेल्या लढाईच्या या ऐतिहासिक साधनाबद्दल अशी वक्तव्ये करावीत यावरून त्यांचे छत्रपतींवरील प्रेम आणि इतिहासाचा अभिमान बेगडी असल्याचे सिद्ध होते. कशाचे राजकारण करावे आणि कशाचे करू नये याचेही भान विरोधकांना नाही, हे यातून दिसून आले. माझ्या लंडन दौऱ्यावरही काही लोकांनी शंका उपस्थित केली. परंतु मी हा दौरा स्वखर्चातून केला हे पुन्हा एकदा स्पष्ट करतो. त्याचे आवश्यक ते पुरावेही माझ्याकडे आहेत. सर्वसामान्य शिवप्रेमींना शिवस्पर्श झालेल्या वाघनखांचे दर्शन घडावे म्हणून राज्य सरकार पुढाकार घेत असताना तरी किमान क्षुद्र राजकारण करू नये. आरोप आणि प्रत्यारोपांसाठी आपल्याला नेहमी संधी मिळतच असतात, आपण त्या घेतही असतो. ही वेळ आहे, इतिहासाचे स्मरण करण्याची आणि शिवप्रभूंच्या असामान्य धाडसापुढे नतमस्तक होण्याची. तमाम शिवप्रेमींसाठी, अवघ्या महाराष्ट्रासाठी आणि देशासाठीसुद्धा ही एक ऐतिहासिक बाब आहे. ही वाघनखे पाहून माझे मन ३६४ वर्षे मागे गेले आणि तो प्रसंग, तो क्षण माझ्या डोळ्यांपुढे जणू साकार झाला. बलाढ्य आणि अजस्र अशा अफझल खानाचा महाराजांनी कसा वध केला.

## संपादकीय »

# पहिली परीक्षा

***मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान ही उत्तरेतील राज्ये अधिक महत्त्वाची आणि त्याखालोखाल दक्षिणेतील तेलंगण.***

निवडणूक आयोगाने पाच राज्यांतील निवडणुका एकदाच्या जाहीर केल्या हे बरे झाले म्हणायचे. त्यामुळे निदान निवडणूक आचारसंहिता तरी लागू होईल आणि या निवडणूक घोषणेच्या अभावी जी आचरट बडबड सुरू होती ती बंद होईल. या निवडणुकेच्छुक राज्यांत गेले काही महिने ज्या काही घोषणांचा पाऊस पडत होता, जी काही स्वप्ने दाखवली होती आणि ती अमलात कशी येणार नाहीत हे प्रतिस्पर्धी सांगत होते, राष्ट्रद्रोही आणि राष्ट्रभक्तीचे जे काही दावे केले जात होते ते आता थांबतील. आता जो काही असेल तो प्रचार असेल आणि तो आचारसंहितेस अनुसरून करावा लागेल. अशा तऱ्हेने मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोरम ही पाच राज्ये पुढील महिन्यापासून आपले स्थानिक लोकप्रतिनिधी निवडू लागतील. नवरात्र आणि त्यानंतर येणारी दिवाळी या राज्यांत आचारसंहितेच्या अमलाखाली असेल.

**योगींचे रामराज्य म्हणून वेगाने विकसित होत असलेल्या प्रदेशातील शाहजहापूरमध्ये रस्ते कंत्राटदाराने 'रंगदारी' दिली नाही म्हणून सत्तारूढ पक्षाच्या आमदाराच्या हस्तकांनी रस्ताच खोदल्याच्या वृत्ताने आमची संघटना अजिबात विचलित झालेली नाही हे आम्ही जेसीबीधारक आरंभीच स्पष्ट करतो. या घटनेच्या माध्यमातून देशात वेगाने उदयास येत असलेल्या 'जेसीबी संस्कृतीला' धक्का पोहचवण्याचे काम केले जात आहे.**

# नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष करा..!

आमचा व्यवसाय कर्माशी निगडित आहे, धर्माशी नाही. 'रंगदारी' वसूल करणे हे जर कुणी कर्माच्या व्याख्येत बसवत असेल तर त्यासाठी आमच्या महागड्या यंत्राला जबाबदार धरणे योग्य नाही. या राज्यात अल्पसंख्य असलेल्या दंगलखोरांची घरे आम्ही जशी पाडतो तसेच रस्तेही उखडतो. हेतू अथवा कार्यकारणभाव मात्र यंत्र भाड्याने घेणाऱ्याच्या मनानुसारच असणार. त्यासाठी जेसीबीला व त्यावरून वेगाने फोफावत असलेल्या संस्कृतीला दोष देणे योग्य होणार नाही. २०१४ पूर्वीपर्यंत या यंत्राला समाजात मानाचे स्थान नव्हते. यानंतर सुशासन आणि विकासाच्या संकल्पना राबवायला सुरुवात झाल्यावर याचे महत्त्व वाढले. 'दंगलमुक्त प्रदेश' घडवण्यासाठी जेसीबीने हातभार लावला. 'रंगदारी' वसूल करणे हे सुशासनासाठी चांगले की वाईट या वादात आम्हाला पडायचे नाही. अनादी काळापासून भारतीय व्यवस्थेत या



ना त्या स्वरूपात अशी वसुली होत आली आहे. व्यवस्था संतुलनासाठी अनेकदा ती गरजेची असते. त्यामुळे 'त्या' एकट्या आमदाराला दोष देऊन चालणारे नाही. जेसीबीचा वापर भलत्याच कारणासाठी होत असल्याची टीकासुद्धा चुकीचीच आहे. प्रचलित काळात जे साधन लोकप्रिय असते त्याचाच वापर करण्याची प्रथा आहे. आधी लोक हत्तीच्या सोंडेतून नेत्यांवर फुलांचा वर्षाव करायचे, आता आमच्या जेसीबीचा वापर केला जातो. हे संस्कृती विस्ताराचे द्योतक असल्याने त्या आमदाराची यात काही चूक असेल असे आम्हाला तरी वाटत नाही. आता प्रदेशातील गुन्हेगारी संपली, गुंतवणूक सुरू झाली असा प्रचार केला जातो. या पार्श्वभूमीवर एखाद्या आमदाराने स्वत:ची गुंतवणूक वाढावी म्हणून हा प्रयोग केला असेल तर त्याचा फार बाऊ करण्याचे कारणच काय? रस्ता उखडण्याचा उद्योग करणारा त्यांचा प्रतिनिधी नव्हता पण पक्षाचा कार्यकर्ता होता. यावरून पक्षाची नाहक बदनामी काहींनी चालवली आहे. त्याकडे जनतेने नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष करावे! जगातला सर्वात मोठा पक्ष चालवण्यासाठी भरपूर खर्च येतो याची आम्हाला कल्पना आहे. त्या खर्चात थोडाफार हातभार लावण्याच्या उद्देशातून ही कृती घडली असेल तर त्यात गैर काही नाही अशी संघटनेची धारणा आहे. या असल्या नाहक चर्चेमुळे केवळ जेसीबी बदनाम होत नाही, तर नवसंस्कृतीलासुद्धा धक्का पोहोचतो. शिवाय आमच्या व्यवसायावर परिणाम होतो तो वेगळाच. त्यामुळे भविष्यात अशा घटनांना अकारण प्रसिद्धी मिळू नये यासाठीच आम्ही संघटनेतर्फे हे निवेदन प्रसृत करीत आहोत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# वारसाचा दावा करणाऱ्यांनी आरसा पहावा!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बाळासाहेबांचे विचार आणि हिंदुत्व एवढे अस्सल आहे की ते कुठेही सांगितले तरी त्यांचे तेज कमी होत नाही. त्या विचारांना शिवाजी पार्कची गरज नाही. आम्ही जाऊ तिथे त्यांचे विचार नेऊ. आपल्याला वारसा मिळाला असे म्हणणाऱ्यांनी आधी आरसा पाहावा म्हणजे खरे काय ते कळेल असा सणसणीत टोला मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला.**

छाती बडवून रडायला शिवाजी पार्क ही जागा नाही, जिथे बाळासाहेबांना अंगार फुलवला होता, तिथे आता हा वैचारिक भंगार ऐकायला कोण जाणार असा सवालही शिंदे यांनी उपस्थित केला आहे. कोण कुठे बोलतो, यापेक्षा काय बोलतो हे महत्त्वाचे आहे. तोंड उघडले की रडगाणेच गाणार असाल तर ते कोण ऐकणार? बाळासाहेबांचा विचार त्यांनी पायदळी तुडवलाय, हे जनतेने पाहिले आहे.

आम्ही बाळासाहेबांनी पेरलेले, जपलेले विचार हृदयात घेऊन पुढे निघालो आहे. विचारांचा वारसा आमच्याकडेच असल्याचेही शिंदे यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. ज्या मैदानातून शिवसेनाप्रमुखांनी काँग्रेसला गाडण्याचा विचार मांडला. ज्या मैदानातून प्रखर



हिंदुत्वाचा जागर त्यांनी केला, त्याच मैदानातून हिदूत्वाची ॲलर्जी असलेल्या काँग्रेसला डोक्यावर घेतले जाणार असेल तर तो शिवसेनेचा दसरा मेळावा असूच शकत नाही. बाळासाहेबांच्या पवित्र विचारांनी भारावलेले शिवतीर्थ गेल्याच वर्षी या मंडळींनी बाटवले आहे. आम्ही ठरवले असते तर या मैदानावर सभा घेतलीही असती. परंतु, राज्याचा प्रमुख म्हणून मला कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणायची नव्हती. त्यामुळे आझाद मैदान आणि क्रॉस मैदानात शिवसेनेचा दसरा मेळावा होणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले आहे.

ज्या मैदानातून शिवसेनाप्रमुखांनी काँग्रेसला गाडण्याचा विचार मांडला, ज्या मैदानातून प्रखर हिंदुत्वाचा जागर त्यांनी केला, त्याच मैदानातून काँग्रेसला डोक्यावर घेतले जाणार असेल तर तो शिवसेनेचा दसरा मेळावा असूच शकत नाही", असं एकनाथ शिंदे म्हणाले. "बाळासाहेबांच्या पवित्र विचारांनी भारावलेले शिवतीर्थ गेल्याच वर्षी या मंडळींनी बाटवले आहे.

आम्ही ठरवले असते तर या मैदानावर सभा घेतलीही असती. परंतु, राज्याचा प्रमुख म्हणून मला कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणायची नव्हती", असंही स्पष्टीकरण त्यांनी दिलं आहे. "बाळासाहेबांचे विचार आणि हिंदुत्व एवढे अस्सल आहेत की ते कुठेही सांगितले तरी त्यांचे तेज कमी होत नाही. त्या विचारांना शिवाजी पार्कची गरज नाही. आम्ही जाऊ तिथे त्यांचे विचार नेऊ. आपल्याला वारसा मिळाला असे म्हणणाऱ्यांनी आधी आरसा पाहावा म्हणजे खरे काय ते कळेल", अशी टीका मुख्यमंत्र्यांनी ठाकरे गटावर केली आहे.

### शिवाजी पार्कमध्ये ठाकरे गटाचा मेळावा

» "शिवाजी पार्कचं मैदान आम्हाला हिंदुत्वाच्या विचारांसाठी मिळावं, अशी आमची भूमिका होती. पण, वाद टाळण्यासाठी आझाद मैदान किंवा क्रांती मैदानातून हिंदुत्वाचे विचार आपल्याला मांडता येतील, अशा प्रकारची भूमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आहे, अशी प्रतिक्रिया सदा सरवणकर यांनी दिली. त्यामुळे शिवाजी पार्क येथे आता ठाकरे गटाचा दसरा मेळावा होणार आहे.

# सुप्रिया सुळेंची अजित पवारांना साद?

## पक्ष ओरबाडण्याची गरज नव्हती : सुप्रिया सुळे

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अजित पवारांच्या बंडखोरीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन गट झाले आहेत. या दोन्ही गटांमधील नेते सातत्याने एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. अजित पवारांच्या गटाने मूळ पक्षावर आणि पक्षाच्या घड्याळ या चिन्हावर दावा केल्यामुळे हे प्रकरण आता निवडणूक आयोगाकडे गेलं आहे. याप्रकरणी निवडणूक आयोगासमोर आतापर्यंत दोन सुनावण्या पार पडल्या आहेत.**

पुढची सुनावणी नोव्हेंबर महिन्यात होईल. दरम्यान, शरद पवार गटातील खासदार सुप्रिया सुळे यांनी निवडणूक आयोगासमोर झालेल्या सुनावणीवर भाष्य केलं आहे. तसेच सुप्रिया सुळे अजित पवार गटातील नेत्यांना म्हणाल्या, तुम्ही मागितलं असतं तर सगळं काही तुम्हाला दिलं असतं. पक्ष



### अरे लेलो यार...दिलदार हूं मैं

» शरद पवार गटातील खासदार सुप्रिया सुळे यांनी निवडणूक आयोगासमोर झालेल्या सुनावणीवर भाष्य केलं आहे. सुप्रिया सुळे अजित पवार गटातील नेत्यांना म्हणाल्या, तुम्ही मागितलं असतं तर सगळं काही तुम्हाला दिलं असतं. पक्ष ओरबाडण्याचा प्रयत्न करण्याची गरज नव्हती. सुप्रिया सुळे अजित पवार गटाला उद्देशून म्हणाल्या, मागितलं असतं तर, माझ्या भावांना सगळं काही देऊन टाकलं असतं... अरे लेलो यार...दिलदार हूं मैं...देवाने मेंदू दिलाय, हातपाय दिले आहेत, सगळं दिलंय...शून्यातून माझं विश्व उभं केलं असतं...आणि तुमची साथ असती तर विश्व उभं करणं अवघड नाही...८३ वर्षांच्या त्या माणसानेही हे सगळं शून्यातूनच उभं केलं आहे.

ओरबाडण्याचा प्रयत्न करण्याची गरज नव्हती. सुप्रिया सुळे अजित पवार गटाला उद्देशून म्हणाल्या, मागितलं असतं तर, माझ्या भावांना सगळं काही देऊन टाकलं असतं...अरे लेलो यार... दिलदार हूं मैं...देवाने मेंदू दिलाय, हातपाय दिले आहेत, सगळं दिलंय...शून्यातून माझं विश्व उभं केलं असतं...आणि तुमची साथ असती तर विश्व उभं करणं अवघड नाही...८३ वर्षांच्या त्या माणसानेही हे सगळं शून्यातूनच उभं केलं आहे. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, एकदा नव्हे तर, तीन वेळा त्यांना (शरद पवार) कर्करोग झाला. तुम्हाला २००९ ची निवडणूक आठवत असेल. ती निवडणूक एकदा आठवा. शरद पवार यांचं तेव्हाचं भाषण आठवा. तेव्हा ते म्हणाले होते, 'तुमचा सेनापती आजारी आहे. परंतु, तुम्ही लढा'. सेनापती आजारी असताना या महाराष्ट्रातील जनता शरद पवारांच्या पाठिशी उभी राहिली. तेव्हा यूपीएचं सरकार आलं. शरद पवार, प्रफुल्ल पटेल केंद्रात मंत्री झाले. २००४ पासून २०१४ पर्यंत १० वर्ष आपण सत्तेत होते. आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला २५ वर्षे झाली आहेत. त्यापैकी १८ वर्षे आपण सत्तेत राहिलो. असा दुसरा कुठला पक्ष आहे का? याचं सगळं श्रेय जनतेला जातं.

# सत्तर वर्षे काँग्रेस झोपा काढत होती का?: आठवले

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज



केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. राहुल गांधींना 'भारत जोडो' यात्रा काढण्याची वेळ का आली? सत्तर वर्षे काँग्रेस झोपा काढत होती का? असा सवाल रामदास आठवले यांनी उपस्थित केला आहे. राहुल गांधींना 'भारत जोडो' यात्रा काढण्याचा कुठलाच अधिकार नाही, अशा शब्दांत रामदास आठवलेंनी सुनावलं आहे. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. रामदास आठवले म्हणाले, "राहुल गांधींना भारत जोडो यात्रा काढण्याची वेळ का आली? सत्तर वर्षे काँग्रेस झोपा काढत होती का? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून भारताला जोडण्याचं काम केलं आहे. हिंदू-मुस्लीम, हिंदू-दलित वाद होत असले, तरी बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला शिकवलं की, जात-धर्म-भाषेपेक्षा देश महत्वाचा आहे. देशावर संकट आल्यानंतर सर्वांनी लढलं पाहिजे." "महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकरांनी भारत जोडण्याचं काम केलं. कायद्यानं जातीव्यवस्था संपवण्यात आली आहे. त्यामुळे भारत जोडलेलाच आहे.

पण, जोडला नसेल, तर काँग्रेसने का जोडला नाही? सगळ्या राज्यांत काँग्रेसची सत्ता असताना काय केलं? ही भारत जोडो नाहीतर भारत तोडो यात्रा होती," असं टीकास्र रामदास आठवलेंनी सोडलं. "राहुल गांधींना 'भारत जोडो' यात्रा काढण्याचा कुठलाच अधिकार नाही. राहुल गांधींच्या यात्रेचा फारसा परिणाम होईल, असं वाटत नाही," असं रामदास आठवलेंनी म्हटलं. "इंडिया हे आपल्या देशाचं नाव आहे. देशाच्या नावावर निवडणूक लढणं ठिक नाही. आम्ही याचा विरोध केला, तर इंडियाला विरोध करतायत असं म्हणतील," असेही रामदास आठवले म्हणाले.

# रुपीनगर, तळवडेतील वीज समस्या सुटणार!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची 'शब्दपूर्ती' : नवीन डीपी, ट्रान्सफार्मरसह प्रकल्पांचे लोकार्पण

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांमध्ये वीज समस्या सोडवण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. त्या अनुशंगाने रुपीनगर, तळवडे भागातील डीपी, ट्रानफॉर्मरसह अन्य प्रकल्पांचे महावितरणच्या माध्यमातून लोकार्पण करण्यात आले.**



जुन्या डीपी आणि ट्रान्सफॉर्मर सातत्याने तांत्रिक बिगड होत होता. परिणामी नागरिकांना खंडित वीज पुरवठ्याला सामोरे जावे लागत होते. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. भोसरी विधानसभा मतदारसंघात विविध ठिकाणी नवीन डीपी आणि ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले आहेत. त्याचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले. त्यामुळे नागरिकांची खंडित वीज पुरवठ्यापासून सुटका होणार आहे.या लोकार्पण सोहळ्यावेळी माजी नगरसेवक शांताराम भालेकर, अस्मिता भालेकर, मा. स्वीकृत नगरसेवक पांडुरंग भालेकर, निलेश भालेकर, शीतल वर्णेकर, बंडू भालेकर, दतू नखाते, बाबू भालेकर, रामदास मोरे, रमेश भालेकर, रमेश बाठे, मुन्ना पवार, सोमनाथ मेमाणे, गजानन वाघमोडे, किरण पाटील, शरद भालेकर, रामदास कुटे, दादा सातपुते, रवी शेतसंधी, रोहन भाते, पंकज आवटे, बाजीराव भालेकर, कैलास भालेकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

### महावितरणकडे यशस्वी पाठपुरावा...

भोसरी विधानसभा मतदारसंघात अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले आहे. यामध्ये देवी इंद्रायणी प्रवेशद्वाराजवळ 630 केव्हीचा, जुना आळंदी रोड संकेत भालेकर यांच्या घराशेजारी 315 केव्हीचा ट्रान्सफॉर्मर बसवला आहे. या बरोबरच के. एन. बी. चौकात 630 केव्ही, सोनवणे वस्तीत 315 केव्हीचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला आहे.

अरविंद इंडस्ट्री येथे 315 केव्हीचा बसविण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हे ट्रान्सफॉर्मर बदलून देण्याची मागणी नागरिक करत होते. त्याची दखल घेत आमदार महेश लांडगे यांनी शासकीय स्तरावर, महावितरणकडे पाठपुरावा केला. त्याला अखेर यश आले.

> भोसरी विधानसभा मतदार संघातील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी आम्ही कायम प्राधान्य दिले आहे. मतदार संघातील वीज पुरवठा यंत्रणा सुमारे ३० वर्षे जुनी असल्यामुळे वाढती लोकसंख्या आणि वीज ग्राहकांची मागणी याचे प्रमाण मोठे असल्यामुळे वीज समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे आगामी काळात इन्फ्रास्ट्रक्चर सक्षम करण्यासाठी आम्ही पाठपुरावा करणार आहोत. त्यामुळे नागरिकांना निश्चितपणे दिलासा मिळेल, असा विश्वास आहे.
>
> **– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा

# पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर 'ब्लॉक'

## पुण्याकडे येणारी अवजड वाहतूक खालापूर टोल नाक्यावर थांबवणार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आयटीएमएस प्रणालीच्या कामासाठी पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर मंगळवारी पुन्हा विशेष ब्लॉक घेतला जाणार आहे. पुण्याकडे येणाऱ्या मार्गिकेवर दुपारी १२ ते २ असा हा दोन तासांचा हा ब्लॉक असणार आहे. अमृतांजन पुलाच्या अलीकडे अन पलीकडे म्हणजे किलोमीटर ४५ आणि ४५.८०० किलोमीटरवर ओव्हरहेड गॅन्ट्री बसवली जाणार असल्याने हा ब्लॉक घेतला जाणार आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.**



या कामावेळी पुण्याकडे येणारी अवजड वाहतूक खालापूर टोल नाक्यावर थांबवली जाणार आहे. तसेच हलकी वाहतूक जुन्या मुंबई-पुणे महामार्गाकडे वळविण्यात येणार आहे. मात्र मुंबईकडे जाणारी वाहतूक मात्र सुरळीत सुरू असणार आहे. याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फक्त कार साठी जुना पुणे – मुंबई महामार्ग शिंग्रोबा घाटातील सुरू राहील.

मुंबई – पुणे द्रुतगती मार्गावर दरडी हटविण्यासाठी ब्लॉक घेण्यात आला होता. अनेकदा हा ब्लॉक घेण्यात आला होता. मात्र तब्बल महिना ते दीड महिन्यांच्या कालावधीनंतर आज (मंगळवारी) पुन्हा १२ ते २ असा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यात पुण्याकडे येणारी वाहतूक थांबवण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशी नागरिकांनी यांची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मुंबई – पुणे ला जोडणारा द्रुतगती मार्ग हा मुख्य रस्ता आहे. या रस्त्यावरून दिवसभरात लाखो वाहने ये – जा करत असतात. या मार्गावरून मुंबईला कमी वेळेत जात येत असल्याने सर्वजण या मार्गाचा वापर केला जातो. त्यामुळे या मार्गाला विशेष महत्व आहे. मात्र विशेष ब्लॉक घेतला जाणार असल्याने तीन तासांसाठी पुण्याकडे येणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. अशी माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील पोलिस बनला कोट्यधीश

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज



सोशल मीडियाच्या जमान्यात जग अगदी जवळ आले आहे. त्यात मोबाईल सारख्या साधनांमुळे पारंपारिक खेळाकडे मुलांचा कल कमी झाला आहे. त्यातच क्रिकेट म्हणजे सर्वांच्या आवडीचा खेळ, काही जण ग्राऊंडवर खेळतात तर काही जण मोबाईलवर खेळतात. तसे गेम देखील मोबाईलमध्ये उपलब्ध झाल्या आहेत. याच मोबाईलवरून गेम खेळल्यामुळे पिंपरी-चिंचवड येथील एका पोलिस उपनिरीक्षकाला क्रिकेटच्या ड्रीम ११ मध्ये तब्बल दीड कोटी रुपयांचे बक्षीस लागले आहे. त्यामुळे त्यांचे खऱ्या अर्थाने ड्रीम पूर्ण झाले आहे.

पिंपरी-चिंचवड आयुक्तालयात काम करत असलेले सोमनाथ झेंडे, असे या अधिकाऱ्याचे नाव आहे. या दीड कोटीमुळे त्यांचे नशीब पालटले आहे. सध्या क्रिकेट विश्वचषक सामने सुरू आहेत. त्यांनी बांगलादेश विरुद्ध इंग्लंड या सामन्यावर टीम लावली होती. यात त्यांना बक्षीस लागल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.

गेल्या तीन चार महिन्यांपासून त्यांनी ड्रीम ११ यावर क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली होती. त्यानुसार त्यांनी सामन्यावर टीम लावली होती. मात्र, त्यांना आता यात दीड कोटींचे बक्षीस मिळाले आहे. सोमनाथ झेंडे यांनी 'मटा ऑनलाइन'ला माहिती देताना सांगितले की, सुरुवातीला माझा यावर विश्वासच बसला नाही. पण, नंतर याचे दोन-दोन लाख रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे हे खरे असल्याचे त्यांनी सांगितले. झेंडे यांना बक्षीस लागल्यानंतर त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे. त्यांच्या कुटुंबात देखील आनंदाचे वातावरण आहे. मात्र, तरीही असे खेळ स्वतःच्या जबाबदारीवर खेळावे जेणे करून आपल्याला कोणत्याही प्रकारचा भुर्दंड सहन करावा लागणार नाही. मात्र, झेंडे यांना लागलेले बक्षीस हे त्यांचे नशीब बदलणारे आहे, असेच म्हणावे लागेल.

# 'द डर्टी पिक्चर'चा दुसरा भाग येणार?



सिल्क स्मिता कोण हे तसं काही चित्रपट रसिकांना माहिती होतं. पण जेव्हा एकता कपूरची निर्मिती असलेला आणि मिलन लुथरिया दिग्दर्शित द डर्टी पिक्चर प्रदर्शित झाला तेव्हा मात्र साऱ्या देशाला सिल्क स्मिता कोण होती हे कळालं होतं. तिचा जीवनप्रवास किती भयाण होता हे त्या चित्रपटातून प्रभावीपणे समोर आले होते. २०११ मध्ये आलेल्या द डर्टी पिक्चरनं त्यावेळी बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई केली होती. त्यात विद्या बालन, तुषार कपूर आणि नसिरुद्दीन शहा यांनी महत्वाच्या भूमिका साकारल्या होत्या. विद्याला त्या भूमिकेसाठी वेगवेगळ्या पुरस्कारानं गौरविण्यात देखील आले होते. आता तर विद्याच्या जागी बॉलीवूडची दुसरी अभिनेत्री भूमिका करणार असल्याचे बोलले जात आहे. त्या अभिनेत्रीच्या नावाची चर्चा रंगली आहे. सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार विद्या बालनची जागा आता क्रिती सेनॉन किंवा तापसी पन्नू घेणार आहे. या दोन्ही अभिनेत्रींपैकी कोणती अभिनेत्री दिसणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. त्यावर दिग्दर्शक मिलन लुथरिया यांनी दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आली आहे. त्यात त्यांनी सध्या तरी त्यावर आपण चित्रपट तयार करण्याचा विचार करत नसल्याचे म्हटले आहे. २०११ साली सर्वाधिक गाजलेला चित्रपट म्हणून द डर्टी पिक्चरचे नाव घ्यावे लागेल. त्यानं बॉक्स ऑफिसवरही मोठी कमाई केली होती. इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीमध्ये लुथरिया यांनी त्याचा सिक्वेल येणार का याचे उत्तर दिले आहे. त्यामुळे ज्या प्रश्नावरुन चर्चांना सुरुवात झाली.

# इस्त्राईलमधला तो थरारक अनुभव : नुसरत



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री नुसरत भरुचा गेल्या दोन ते तीन दिवसांपासून चर्चेत आल्याचे दिसून आले आहे. सध्या इस्त्राईल हा देश युद्धाच्या छायेत आहे. दोन दिवसांपूर्वी हमास नावाच्या दहशतवादी संघटनेनं त्या देशावर हल्ला केला होता. हमासनं इस्त्राईलवर केलेल्या हल्ल्यात शेकडो नागरिकांचे प्राण गेले आहेत. या हल्ल्याला इस्त्राईलनं देखील जशास तसे उत्तर दिले आहे. इस्त्राईलच्या पंतप्रधानांनी देखील अशा प्रकारचा भ्याड हल्ला सहन केला जाणार नाही. आणि ज्यांनी कुणी हे धाडस केले आहे त्यांना योग्य ती शिक्षा दिल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. असे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी सांगितले होते. प्रसिद्ध अभिनेत्री बॉम्ब हल्ल्याच्या वेळी इस्त्राईलमध्ये एका कार्यक्रमाच्या निमित्तानं गेली होती. तिला काही वेळ तिथं अडकून राहावे लागले. दरम्यानच्या काळात नुसरतप्रती काळजी व्यक्त करणाऱ्या पोस्ट, व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागले होते. तिच्या कुटूंबियांनी देखील ती आता भारतात परतणार असल्याचे म्हटले होते. त्यानंतर काही तासांतच नुसरतचं मुंबईत आगमन झालं होतं. सध्या सोशल मीडियावर नुसरतनं एका व्हिडिओच्या माध्यमातून प्रतिक्रिया दिली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली आहे. त्या व्हिडिओतून त्यावेळी इस्त्राईलमध्ये काय परिस्थिती होती हे नुसरतनं सांगितले आहे. तिच्या त्या व्हिडिओवर नेटकऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. इस्त्राईलवर हल्ला झाला आहे असे जेव्हा मला कळले तेव्हा धक्काच बसला.

# झरीन खानला कोर्टाचा मोठा दिलासा!



बॉलिवूड अभिनेत्री झरीन खान ही गेल्या काही दिवसांपासून फसवणुक प्रकरणामुळे चर्चेत आली होती. आता तिच्याबाबत एक मोठी बातमी समोर आली आह कोलकाता सियालदह कोर्टातून झरीन खानच्या नावावर अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. त्यामुळे अभिनेत्रीवर अटकेची टांगती तलवार कायम होती आता मात्र हे अटक वॉरंट कोलकाता दंडाधिकाऱ्यांनी रद्द केले आहे. झरीन खानने जामिनासाठी अपील केली नव्हती आणि ती न्यायालयात हजरही न झाल्याने तिच्या विरोधात हे अटक वॉरंट जारी करण्यात आले होते. त्यामुळे झरीन कायदेशीर अडचणीत अडकल्याच्या बातम्या व्हायरल झाल्या होत्या. आता झरीन खान विरुद्ध जारी केलेले अटक वॉरंट त्वरित रद्द करण्यात आले आहे. तपास अधिकाऱ्यांनी दिलेल्या दिशाभूल करणाऱ्या माहितीमुळे हे अटक वॉरंट जारी करण्यात आली होती असं देखील यावेळी सांगण्यात आली आहे. हे प्रकरण 2018 चे आहे. एका इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीने झरीन खानविरुद्ध ही तक्रार केली होती. कोलकाता येथे 6 कार्यक्रमांना उपस्थित राहणार होती ती दुर्गापूजेच्या कार्यक्रमात परफॉर्म करणार होती. मात्र ती आली नाही. त्यामुळे आयोजकाने झरिन खान आणि तिच्या मॅनेजरविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल केली होती. आयोजकांनी चुकीची माहिती दिल्याचा आरोप यावेळी झरिनच्या टीमकडून करण्यात आला होता. तर यापुर्वी झरीनने अटक वॉरंटबद्दल कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. याशिवाय झरीनने तिच्या विमान तिकिटांबाबत आयोजकांमध्ये गैरसमज असल्याचा खुलासाही केला होता. झरीन खानच्या कामाच्या बाबतीत बोलायचं झालं तर तिने सलमान खानच्या 'वीर' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. यानंतर ती 'हाऊसफुल 2', 'हेट स्टोरी 3', '1921' आणि 'अक्सर 2' सारख्या चित्रपटांमध्ये दिसली आहे.

# तेजस्विनी पंडितसोबत काय झालंय?

मराठी अभिनेत्री तेजस्विनी पंडित हे मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय नाव आहे. तेजस्विनी नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. तिने अभिनयासोबतच तिच्या सौंदर्यानेही सर्वांना वेड लावलं आहे. मात्र तेजस्वीनी काही दिवसांपासून तिच्या ट्विटमुळे चर्चेत आली आहे. तिने यापुर्वी टोल मुद्यावर केलेल्या ट्विटची चांगलीच चर्चा झाली होती.

आता तेजस्वीनीच्या ट्विटर अकाऊंटचं व्हेरिफिकेशन काढून घेण्यात आलं आहे. एक्स अकाउंटची ब्लू टिक काढून टाकण्यात आल्याने तेजस्वीनी चांगलीच संतापली असल्याचं दिसतंय. तेजस्वीनी याबाबत ट्विटरवर एक पोस्ट शेयर केली आहे. माझ्या X (ट्विटर) अकाऊंटचं व्हेरिफिकेशन काही लोकांनी माझं स्पष्ट मत सहन न झाल्याने राजकीय दबाव टाकून काढून टाकण्यास सांगितलं, कारण का तर मी एक 'आम्हा जनतेची' इतकी वर्ष फसवणूक झाली असा वाटणारा प्रश्न उपस्थित केला म्हणून? सामान्यांचा आवाज बंद करणे हाच ह्यांचा बहुदा एकमात्र 'X' फॅक्टर आहे हे मात्र स्पष्ट होत जाईल. असो, माझा 'जय हिंद जय महाराष्ट्र'साठीचा घोष योग्य वेळी सुरूच राहील.

सत्तेत कोणीका बसेना, आम्ही जनता आहोत ! जेंव्हा जेंव्हा आमची पिळवणूक होईल, दिशाभूल होईल, तेव्हा तेव्हा आमचा आवाज दुमदूमणारच आहे ! ! !

# इंग्लंडने बांगलादेशला चिरडले!

## » इंग्लंडने तब्बल 137 धावांनी चारली बांगलादेशला धूळ

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वचषकाच्या सातव्या सामन्यात इंग्लंडने बांगलादेशचा १३७ धावांनी पराभव केला. विश्वचषक स्पर्धेतील त्याचा हा पहिलाच विजय आहे. इंग्लंडला पहिल्या सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले होते. त्याचबरोबर बांगलादेशचा पहिला पराभव झाला आहे. पहिल्या सामन्यात त्याने अफगाणिस्तानचा पराभव केला होता. बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने ५० षटकांत नऊ गडी गमावून ३६४ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ ४८.२ षटकांत सर्वबाद २२७ धावांवर आटोपला.**




इंग्लंडने बांगलादेशचा पराभव करत विश्वचषक स्पर्धेत पहिला विजय नोंदवला. या विजयासह त्याचे दोन गुण झाले. तो आता गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आला आहे. त्याचवेळी मोठ्या पराभवामुळे बांगलादेश संघ सहाव्या स्थानावर घसरला आहे. त्याचेही दोन सामन्यांत दोन गुण आहेत. इंग्लंडने या सामन्यात मोठा बदल करत डावखुरा वेगवान गोलंदाज रीस टॉपलीचा संघात समावेश केला. त्याने मोईन अलीला बाद केले. इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरचा हा निर्णय योग्य ठरला. टॉपलीने अप्रतिम गोलंदाजी करत चार विकेट्स घेतल्या. त्याने सुरुवातीच्या षटकांत इंग्लंडला यश मिळवून दिले. याचा फायदा संघाला झाला आणि इंग्लंडने १३७ धावांनी मोठा विजय मिळवला.

बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने ५० षटकांत नऊ गडी गमावून ३६४ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ ४८.२ षटकांत सर्वबाद २२७ धावांवर आटोपला. इंग्लंडला पहिल्या सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले होते. संघ आता विजयी मार्गावर परतला आहे. त्याचबरोबर बांगलादेशचा पहिला पराभव झाला आहे. पहिल्या सामन्यात त्याने अफगाणिस्तानचा पराभव केला होता. आपल्या पहिल्याच सामन्यात पराभवाची चव चाखावी लागलेल्या इंग्लंडने या सामन्यात शानदार पुनरागमन केले. त्यांनी विजयी सुरुवात केलेल्या बांगलादेशला अगदी एकतर्फी झालेल्या सामन्यात १३७ धावांनी पराभूत करत विजय नोंदवला. या सामन्यात प्रथम फलंदाजीची संधी मिळालेल्या इंग्लंडला डेव्हिड मलान व जॉनी बेअरस्टो यांनी १७.५ षटकात ११५ धावांची दमदार सलामी दिली. डेव्हिड मलान याने या सामन्यात १०७ चेंडूंचा सामना करताना १४० धावांची तुफानी शतकी खेळी केली. दुसरीकडे जो रूटने ६८ चेंडूंत ८२ धावांची आक्रमक अर्धशतकी खेळी खेळली. बांगलादेश संघासाठी शोरीफुल इस्लाम याने सर्वाधिक चार तर मेहदी हसनने तीन विकेट्स घेतल्या.

### मलानचा शतकी तडाखा

» मलानने आपल्या शतकी खेळीत (107 चेंडूत 140 धावा) 16 चौकार आणि 5 षटकार ठोकले. त्याचा स्ट्राइक रेट 130.84 होता. त्याने अवघ्या 91 चेंडूत आपले शतक पूर्ण केले. मालनचे हे विश्वचषकातील पहिले शतक आहे. या दरम्यान, तो एका कॅलेंडर वर्षात इंग्लंडसाठी सर्वाधिक शतके करणारा संयुक्त तिसरा खेळाडू बनला आहे. बेअरस्टो आणि डेव्हिड गोवर यांनी यापूर्वी अशी कामगिरी केली आहे. मलानच्या 2023 मध्ये 11 एकदिवसीय सामन्यांमध्ये 745 धावा झाल्या आहेत.

### लिटन दासचे 11 वे अर्धशतक

» बांगलादेशसाठी सलामीवीर लिटन दासने कठीण काळात चमकदार फलंदाजी केली. त्याने 66 चेंडूत 115.15 च्या स्ट्राईक रेटने 76 धावा केल्या. या खेळीत त्याने 7 चौकार आणि 2 षटकार मारले. लिटनचे हे एकदिवसीय कारकिर्दीतील 11 वे अर्धशतक ठरले. 49 च्या स्कोअरवर बांगलादेशचे 4 खेळाडू बाद झाले होते. त्यानंतर लिटनने मुशफिकुर रहीमसह डावाची धुरा सांभाळली. दोघांनी 5व्या विकेटसाठी 72 धावा जोडल्या.

# गिल वर्ल्ड कपमधून जाणार बाहेर?

## » अफगान सामन्यानंतर निवडकर्त्यांची बैठक

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एकदिवसीय वर्ल्डकप 2023 चा रणसंग्राम सुरू झाला आहे. दुसरा सामना खेळण्यासाठी भारतीय संघ दिल्लीत पोहोचला आहे. सर्वाधिक वेळा वर्ल्डकप जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाचा पराभव केल्यानंतर आता अफगाणिस्तानची पाळी आहे. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर हा सामना होणार आहे.**

दरम्यान, शुभमन गिल अजूनही चेन्नईतच आहे. सोमवारी त्याला काही काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, त्यानंतर तो हॉटेलमध्ये परतले असल्याचे सांगण्यात येत आहे. गिल संघात कधी परतणार आणि पहिला सामना कधी खेळणार हे सांगणे सध्या कठीण आहे. दरम्यान, शुभमन गिलसाठी बीसीसीआय दोन खेळाडूंच्या नावावर विचार करत असल्याची बातमी आहे. याबाबत लवकरच निर्णय होऊ शकतो. ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात शुभमन गिल खेळला नव्हता. यानंतर तो 11 ऑक्टोबरला म्हणजे उद्या अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यातूनही तो बाहेर जाणार हेही निश्चित आहे. भारतीय संघ 14 ऑक्टोबरला पाकिस्तानशी भिडणार आहे. हा सामना खूप महत्त्वाचा असणार आहे. दरम्यान, इंडियन एक्सप्रेसच्या एका वृत्ताने सर्वांनाच धक्का दिला आहे. शुभमन गिलसाठी कव्हर म्हणून दोन खेळाडूंच्या नावाचा विचार केला जात असल्याचे अहवालात म्हटले आहे. बुधवारी जेव्हा भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध खेळेल तेव्हा बीसीसीआयचे काही अधिकारी आणि निवड समितीही दिल्लीत असतील. या दरम्यान एखाद्या खेळाडूच्या नावाची घोषणा केली जाऊ शकते.

### यशस्वी किंवा ऋतुराजला संधी ?

» शुभमन गिल अजूनही चेन्नईतच आहे. सोमवारी त्याला काही काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, त्यानंतर तो हॉटेलमध्ये परतले असल्याचे सांगण्यात येत आहे. गिल संघात कधी परतणार आणि पहिला सामना कधी खेळणार हे सांगणे सध्या कठीण आहे. दरम्यान, शुभमन गिलसाठी बीसीसीआय दोन खेळाडूंच्या नावावर विचार करत असल्याची बातमी आहे. यशस्वी जैस्वाल किंवा ऋतुराज गायकवाड हे कव्हर म्हणून संघात सामील होऊ शकतात.



# ऑलिंपिक समितीची १४ ऑक्टोबरपासून बैठक!

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

मुंबईतील वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथे जिओ कन्वेंशन सेंटरमध्ये येत्या 15 ते 17 ऑक्टोबर दरम्यान घेतली जाणार आहे. सुमारे 40 वर्षानंतर आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीची बैठक देशात होत आहे. यापूर्वी 1983 मध्ये दिल्लीत ही बैठक झाली होती. या बैठकीमुळे भारताला क्रीडा क्षेत्रात जागतिक नकाशावर स्वतःला स्थापित करणं शक्य होणार आहे. तसंच भारतासाठी क्रीडा क्षेत्रातील हे अत्यंत महत्त्वाचं पाऊल ठरणार असल्याचं क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी सांगितलं.

पंतप्रधानांची बैठकीला उपस्थिती : आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीला आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या कार्यकारी सदस्य आणि देशाच्या प्रतिनिधी नीता अंबानी उपस्थित असणार आहेत. कार्यकारी मंडळासोबत ही बैठक 12 ते 14 ऑक्टोबर दरम्यान होणार आहे. या सत्राचा उद्घाटन समारंभ 14 ऑक्टोबरला पार पडणार आहे. यावेळी ऑलिंपिक समितीचे अध्यक्ष थॉमस बाक उपस्थित राहणार आहेत.सहाशेजण राहणार उपस्थित : हा या सत्रामध्ये ऑलिंपिक खेळांच्या यजमानाची निवड करणं, ऑलिंपिक समितीचे सदस्य आणि आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या कार्यकारी मंडळाची निवड करणं, ऑलिंपिक सनद ठरविणं तसंच त्यात सुधारणा करणं, ऑलिंपिक कार्यक्रमात खेळ प्रकारांचा समावेश करणं अथवा वगळणं याबाबतीत चर्चा होणार आहे. या बैठकीला आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीचे 600 आंतरराष्ट्रीय आणि देशातील शंभर प्रमुख खेळ प्रकारातील सहाशे व्यक्ती उपस्थित राहणार असल्याचं बनसोडे यांनी सांगितलं.